**ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत**
**ग्रामीण विभागातील तिर्थक्षेत्रे यांच्या**
**विकासाबाबत**

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक : तिर्थवि-२०११/प्र.क्र.६५१/योजना-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १६ नोव्हेंबर, २०१२

**वाचा** :- १) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
क्र. :व्हीपीएम-१०९६/२२०/२२, दि. २८ ऑक्टोबर, १९९७
२) शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
क्र. : विकास-२००८/प्र.क्र.५००/योजना-७, दि. १५ सप्टेंबर, २००८
३) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
क्र. : तिर्थवि-२०११/प्र.क्र.५६७/योजना-७, दि. १२ ऑक्टोबर, २०११.

**प्रस्तावना:** राज्यातील विविध तिर्थक्षेत्राचा / यात्रास्थळांचा विकास करुन त्या ठिकाणी भाविकांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात या हेतूने ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजना सुरु करण्यात आलेली आहे. यासाठी वाचा मधील संदर्भ क्र.१ ते २ येथील शासन निर्णयानुसार निर्णय घेण्यात आलेला आहे. या निर्णयानुसार आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तथापि, तिर्थक्षेत्र विकासासाठी निधीची उपलब्धता, स्थानिक पातळीवर भाविकांच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासंदर्भातील मागण्या आणि ठरविण्यात आलेले निधीबाबतचे निकष विचारात घेऊन वाचा मधील क्र. १ व २ शासन निर्णय रद्द करुन नव्याने शासन निर्णय पारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार आता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील ' अ ' ' ब ' व ' क ' वर्ग तिर्थक्षेत्रांच्या विकासाबाबतच्या प्रस्तावावर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**"अ" वर्ग तिर्थक्षेत्रे :-**

ग्रामीण भागामध्ये राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय किर्तीचे तिर्थक्षेत्र असलेल्या ठिकाणी जिल्हयाच्या पोलीस यंत्रणेकडून मिळत असलेल्या माहितीवरुन, ज्या ठिकाणी दररोज येणाऱ्या भाविकांची संख्या व यात्रा / संभारंभाच्या वेळी १० ते १५ लाख किंवा त्याहूनही अधिक भाविक येतात अशी सर्व तिर्थक्षेत्रे 'अ' वर्ग तीर्थक्षेत्रात समाविष्ट होण्यास पात्र असतील. अशा ठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी मोठया प्रमाणावर पायाभूत सुविधा असणे आवश्यक आहेत. पायाभूत सुविधेप्रमाणेच मोठया प्रमाणावर निधीची आवश्यक

असते. सदर निधी काही प्रमाणावर केंद्र शासनाकडून तसेच परराष्ट्राकडून मिळत असतो. प्राप्त होणाऱ्या निधीतुन आवश्यकतेनुसार पायाभूत सुविधा देण्यात येते.

राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय किर्तीच्या तिर्थक्षेत्राचा विकास आराखडा तयार करुन विभागाकडे सादर केल्यास, सदर विभागाकडुन केंद्र शासनाकडे विकास आराखडयाची मान्यता मिळविणे आणि त्या अनुषंगाने निधी मिळविणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**"ब" वर्ग तिर्थक्षेत्रे :-**

**(अ)** ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्राच्या महात्म्यामुळे सदर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी दररोज अंदाजे १५०० ते २००० भाविकांची किंवा त्यापेक्षा कमी भाविकांची आणि यात्रा / उत्सवाच्या वेळी दरवर्षी चार लाखापेक्षा जास्त भाविकांची उपस्थिती असते. या उपस्थितीच्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी शासनाने विहीत केलेल्या प्रमाणपत्रात भाविकांची उपस्थिती प्रमाणित करुन दिल्यास अशी तिर्थक्षेत्रे ' ब ' वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा मिळण्याकरिता पात्र ठरु शकतील. सदर तिर्थक्षेत्रांस ' ब ' वर्ग दर्जा मिळण्यासाठी संबंधित जिल्हा परिषदांनी खालील कागदपत्रांसह सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात (परिशिष्ट-अ) प्रस्ताव सादर करावा.

१. वर्षभरात चार लाखापेक्षा जास्त भाविकांच्या उपस्थितीबाबत जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे शासनाने विहित केल्याप्रमाणे प्रमाणपत्र.

२. संबंधित ग्राम पंचायतीचा / संबंधित देवस्थान ट्रस्ट या संस्थेचा विकासाबाबतचा ठराव.

३. ग्राम पंचायत / देवस्थान ट्रस्ट यांच्या मालकीच्या जागेचा ७/१२ उतारा.

४. जागेचा नमुना ८ उतारा असल्यास सदर जागेवर प्रस्तावित कामांचे बांधकाम करण्याबाबत ग्राम पंचायत/ट्रस्टची प्रमाणपत्र.

५. प्रत्येक सुविधासाठी लागणारी जमीन, तेवढीच जमीन ग्राम पंचायत / जिल्हा परिषदेला हस्तांतरीत करण्यात यावी. यासाठी देवस्थान ट्रस्टच्या मालकीची जागा (जागेचा ७/१२ उतारा किंवा नमुना ८ उतारा) असल्यास रु.१००/- च्या स्टँप पेपरवर सदर जागा ग्राम पंचायत / जिल्हा परिषदेकडे हस्तातंरीत करण्यात येत आहे, अशा प्रकारचे देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष, यांची सही व शिक्का असलेले प्रमाणपत्र.

६. प्रस्तावित कामे अन्य कोणत्याही योजनेतून घेण्यात आली नसल्याचे ग्राम पंचायत / जिल्हा परिषद यांचे प्रमाणपत्र.

७. प्रस्तावित कामांच्या बांधकामासाठी उपलब्ध असलेली जागा वनक्षेत्रात येत नसल्याचे वन विभागाचे प्रमाणपत्र.

८. देवस्थान परिसराचा मोठया आकाराचा (६० सें.मी. X ६० सें.मी.) रंगीत साईट प्लॅन (त्यामध्ये देवस्थानचा परिसर, मालकीची असलेली जागा, चहूबाजूंनी होणारा रस्ता, तेथे उपलब्ध असणाऱ्या सुविधा (Existing) आणि उपलब्ध करुन द्यावयाच्या सुविधा (Proposed) इ. समावेश असावा).

९. सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती यांनी तिर्थक्षेत्रास ' क ' वर्ग दर्जा असल्याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र किंवा जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताची सत्यप्रत

उपरोक्त नमूद १ ते ९ येथील कागदपत्रांची पूर्तता करण्यात आलेली किंवा नाही ते पाहून त्या आधारे वाचा मधील ३ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या राज्य निकष समितीद्वारा ' ब ' वर्ग दर्जा देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

**(ब) तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी पायाभूत सुविधा (Infrastructure) उपलब्ध करुन देण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-**

१. मुख्य रस्त्यापासुन तिर्थक्षत्र / यात्रास्थळ / मुख्यस्थळ / मंदीर / समाधी इत्यादी सारख्या मुख्य स्थळापासून मुख्य रस्त्यापर्यंतच्या (Main Road) ज्यांचे अंतर अंदाजे ८०० ते १००० मीटर असेल अशा पोहोच रस्त्याचे (Approach Road) चे काम हाती घेता येईल. त्या अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण, रुंदीकरण या व इतर माध्यमातून काम करता येईल.

२. पोहोच रस्त्यावर पथदीवे उभारता येतील.

३. मंदिर परिसरात संरक्षण भिंत बांधता येईल.

४. पिण्याच्या पाण्यासाठी टाकी बांधणे व त्या अनुषंगाने परिसरात नळाद्वारे पाणी पुरवठा करणे अशी कामे हाती घेता येतील.

५. तिर्थक्षेत्र नदी किंवा ओढा यांच्याजवळ असेल तर अशा नदी किंवा ओढयावर संरक्षण भिंत बांधण्याचे काम हाती घेता येईल.

६. स्त्री व पुरुष शौचालय आणि स्नानगृहे बांधता येतील.

७. स्त्री व पुरुष भाविकांच्या निवासासाठी वेगवेगळी भक्त निवासे बांधता येतील.

८. तिर्थक्षेत्राचा परिसर सुशोभित व स्वच्छ रहावा या दृष्टीकोनातून उपलब्ध जागेवर झाडे लावणे आवश्यक राहील. तसेच आवश्यक त्या ठिकाणी Paving Block चेही काम करता येईल.

९. भाविकांच्या वाहनासाठी Paving Block सह वाहनतळाचे बांधकाम करता येईल.

**(क) ग्रामीण तिर्थक्षेत्र विकासासाठी निधीची मर्यादा :-**

वरील परिच्छेद ब मधील नमूद करण्यात आलेल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य स्तरावरुन एका **"ब"** वर्ग दर्जा प्राप्त तिर्थक्षेत्रास रु. २.०० कोटी (रुपये दोन कोटी फक्त) इतक्या मर्यादेत एकरकमी / टप्प्याटप्प्याने निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**(ड) ग्राम पंचायत / देवस्थान ट्रस्टने करावयाची कामे :-**

शासनाच्या विविध विभागाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीतून किंवा ग्रामपंचायत, देवस्थान ट्रस्ट किंवा यांनी स्वनिधीतून हाती घ्यावयाची कामे--

अ. सौंदर्यीकरणाच्या दृष्टीकोनातून बागबगीच्याची कामे हाती घ्यावीत.

ब. शासनाच्या विविध विभागामार्फत उपलब्ध होणाऱ्या निधीतून एसटी स्टँड, ग्रामीण रुग्णालय, विजेचा ट्रान्सफॉर्मर किंवा सबस्टेशन तसेच पोलीस चौकी बांधण्यासाठी ग्रामपंचायतद्वारे किंवा ट्रस्टद्वारे पाठपुरावा करण्यात यावा.

क. तलावापासून ते पाण्याच्या टाकीपर्यंत पाणी नेण्यासाठी संबंधित विभागाकडून मंजुरी मिळविण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा.

ड. तिर्थक्षेत्रासाठी प्रवेशद्वार ग्रामपंचायत किंवा ट्रस्ट यांनी करणे आवश्यक राहील.

इ. दर्शनाची रांग आणि प्रदक्षिणाची रांग यासाठी ग्रामपंचायत / ट्रस्ट यांनी दर्शनबारी बांधणे आवश्यक आहे.

ई. देवस्थान किंवा ग्रामपंचायत यांना आपल्या हिश्याची रक्कम सेवाभावी संस्थेकडून किंवा दानशूर व्यक्तीकडून देणगी स्वरुपात घेण्यास मुभा राहील.

**(इ) देखभाल व दुरुस्ती करणे :-**

तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी ग्रामपंचायत / स्थानिक देवस्थान ट्रस्टची राहील. यासाठी आवश्यक ते शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**(ई) "ब" वर्ग दर्जा प्राप्त झाल्यानंतर निधी वितरणासाठी सादर करावयाचे प्रस्ताव**

राज्य निकष समितीसमोर ' ब ' वर्ग दर्जा प्राप्त झाल्यानंतर निधी वितरणासाठी स्थळदर्शक नकाशा, कामाचे अंदाजपत्रक आणि कामाचा आराखडा इत्यादी चा प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता घेऊन सादर करण्यात यावे. सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता नसेल तर असे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

**(उ) इतर बाबी :-**

१. ' क ' वर्ग ग्रामीण तिर्थक्षेत्राच्या विकास कामासाठी निधीचे प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाठवू नयेत.

२. शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांमध्ये कोणतेही धार्मिक कार्य करण्यात येऊ नये.

३. पशुहत्या व अंधश्रध्दा वाढीला प्रोत्साहन देणाऱ्या तिर्थक्षेत्रांना ' ब ' वर्ग दर्जा दिला जाणार नाही तसेच निधी वितरीत केला जाणार नाही.

<u>' क ' वर्ग तिर्थक्षेत्रे :-</u>

(अ) ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्राच्या महात्म्यामुळे सदर तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी दररोज सुमारे २०० ते ५०० भाविकांची आणि यात्रा / उत्सवाच्या वेळी दरवर्षी एक लाखापेक्षा जास्त भाविकांची उपस्थिती असते. या उपस्थितीच्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी शासनाने विहीत केलेल्या प्रमाणपत्रात भाविकांची उपस्थिती प्रमाणित करुन दिल्यास अशी तिर्थक्षेत्रे ' क ' वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा मिळण्याकरिता पात्र ठरु शकतील. सदर ' क ' वर्ग दर्जा मिळण्यासाठी संबंधित जिल्हा परिषदांनी खालील कागदपत्रांसह सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात प्रस्ताव जिल्हा नियोजन व विकास समितीसमोर सादर करावा.

१. वर्षभरात एका लाखापेक्षा जास्त भाविकांच्या उपस्थितीबाबतचे जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे प्रमाणपत्र.

२. संबंधित ग्राम पंचायतीचा/संबंधित देवस्थान ट्रस्ट या संस्थेचा विकासाबाबतचा ठराव.

३. ग्राम पंचायत / देवस्थान ट्रस्ट यांच्या मालकीच्या जागेचा ७/१२ उतारा.

४. जागेचा नमुना ८ उतारा असल्यास सदर जागेवर प्रस्तावित कामांचे बांधकाम करण्याबाबत ग्राम पंचायत / ट्रस्टचे प्रमाणपत्र.

५. प्रत्येक पायाभूत सुविधासाठी लागणारी जमीन तेवढीच जमीन ग्राम पंचायत /जिल्हा परिषदेस हस्तांतरीत करावी यासाठी देवस्थानच्या मालकीची जागा (जागेचा ७/१२ उतारा किंवा नमुना ८ उतारा) असल्यास रु.१००/- च्या स्टँप पेपरवर सदर जागा ग्राम पंचायत / जिल्हा परिषदेकडे हस्तातंरीत करण्यात येत आहे. अशा प्रकारचे देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष, यांची सही व शिक्का असलेले प्रमाणपत्र.

६. प्रस्तावित कामे अन्य कोणत्याही योजनेतून घेण्यात आली नसल्याचे ग्राम पंचायत / जिल्हा परिषद यांचे प्रमाणपत्र.

७. प्रस्तावित कामांच्या बांधकामासाठी उपलब्ध असलेली जागा वनक्षेत्रात येत नसल्याचे वन विभागाचे प्रमाणपत्र.

८. देवस्थान परिसराचा मोठ्या आकाराचा (६० सें.मी x ६० सें.मी.) रंगीत साईट प्लॅन (त्यामध्ये देवस्थानचा परिसर, मालकीची असलेली जागा, चहूबाजुंनी होणारा रस्ता, तेथे उपलब्ध असणाऱ्या सुविधा (Existing) आणि उपलब्ध करुन द्यावयाच्या सुविधा (Proposed) इ. समावेश असावा).

उपरोक्त नमूद १ ते ८ येथील कागदपत्रांची पूर्तता करण्यात आलेली किंवा नाही ते पाहून त्या आधारे जिल्हा नियोजन व विकास मंडळासमोर निर्णयार्थ प्रस्ताव सादर करण्यात यावा. जिल्हा नियोजन व विकास मंडळ समितीद्वारा **' क '** वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा देण्याचा निर्णय घेईल.

**(ब) तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी पायाभूत सुविधा (Infrastructure) उपलब्ध करुन देण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-**

१. मुख्य रस्त्यापासुन तिर्थक्षत्र / यात्रास्थळ / मुख्यस्थळ / मंदीर / समाधी इ. सारख्या मुख्य स्थळापासून मुख्य रस्त्यापर्यंतच्या (Main Road) ज्यांचे अंतर अंदाजे ८०० ते १००० मीटर पेक्षा कमी असेल अशा पोहोच रस्त्याचे (Approach Road) चे काम हाती घेता येईल. त्या अंतर्गात रस्त्याचे मजबुतीकरण, रुंदीकरण या व इतर माध्यमातून काम करता येईल.

२. पोहोच रस्त्यावर पथदीवे उभारता येतील.

३. पिण्याच्या पाण्यासाठी टाकी बांधणे व त्या अनुषंगाने परिसरात नळाद्वारे पाणी पुरवठा करणे अशी कामे हाती घेता येतील.

४. तिर्थक्षेत्र नदी किंवा ओढा यांच्याजवळ असेल तर अशा नदी किंवा ओढयावर संरक्षण भित बांधण्याचे काम हाती घेता येईल.

५. स्त्री व पुरुष शौचालय आणि स्नानगृहे बांधता येतील.

६. स्त्री व पुरुष भाविकांच्या निवासासाठी वेगवेगळी भक्त निवासे बांधता येतील.

७. तिर्थक्षेत्राचा परिसर सुशोभित व स्वच्छ रहावा या दृष्टीकोनातून उपलब्ध जागेवर झाडे लावणे आवश्यक राहील. तसेच आवश्यक त्या ठिकाणी Paving Block चेही काम करता येईल.

८. भाविकांच्या वाहनासाठी Paving Block सह वाहनतळाचे बांधकाम करता येईल.

**(क) ग्रामीण तिर्थक्षेत्र विकासासाठी निधीची मर्यादा :-**

वरील परिच्छेद ब मधील नमूद करण्यात आलेल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेसाठी जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडून मान्य केलेल्या जिल्हा निहाय अर्थसंकल्पीय तरतूदी नियोजन विभागाच्या मान्यतेने प्रतिवर्षी रु. ३०.०० लाखापर्यंत प्रत्येक जिल्हाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तरतूद करुन घ्यावी. या उपलब्ध निधीतून "क" वर्ग दर्जा प्राप्त झालेल्या तिर्थक्षेत्राचा खर्च भागविण्यात यावा.

**(ड) ग्राम पंचायत / देवस्थान ट्रस्टने करावयाची कामे :-**

१. शासनाच्या विविध विभागाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीतून किंवा ग्रामपंचायत, देवस्थान ट्रस्ट किंवा यांनी स्वनिधीतून हाती घ्यावयाची कामे

अ. सौंदर्यीकरणाच्या दृष्टीकोनातून बागबगीच्याची कामे हाती घ्यावीत.

ब. शासनाच्या विविध विभागामार्फत उपलब्ध होणाऱ्या निधीतून एसटी स्टँड, ग्रामीण रुग्णालय, विजेचा ट्रान्सफॉर्मर किंवा सबस्टेशन तसेच पोलीस चौकी बांधण्यासाठी ग्रामपंचायतद्वारे किंवा ट्रस्टद्वारे पाठपुरावा करण्यात यावा.

क. तलावापासून ते पाण्याच्या टाकीपर्यंत पाणी नेण्यासाठी संबंधित विभागाकडून मंजुरी मिळविण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा.

ड. तिर्थक्षेत्रासाठी प्रवेशद्वार ग्रामपंचायत किंवा ट्रस्ट यांनी करणे आवश्यक राहील.

इ. दर्शनाची रांग आणि प्रदक्षिणाची रांग यासाठी ग्रामपंचायत / ट्रस्ट यांनी बांधणे आवश्यक आहे.

ई. देवस्थान किंवा ग्रामपंचायत यांना आपल्या हिश्याची रक्कम सेवाभावी संस्थेकडून किंवा दानशूर व्यक्तीकडून देणगी स्वरुपात घेण्यास मुभा राहील.

**(इ) देखभाल व दुरुस्ती करणे**

तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी ग्रामपंचायत / स्थानिक देवस्थान ट्रस्टची राहील. यासाठी आवश्यक ते शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**(ई) "क" वर्ग दर्जा प्राप्त झाल्यानंतर निधी वितरणासाठी सादर करावयाचे प्रस्ताव**

निकष समितीसमोर ' क' वर्ग दर्जा प्राप्त झाल्यानंतर निधी वितरणासाठी स्थळदर्शक नकाशा, कामाचे अंदाजपत्रक आणि कामाचा आराखडा इत्यादी चा प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन सादर करण्यात यावे. सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता नसेल तर असे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

**(उ) इतर बाबी**

१. शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांमध्ये कोणतेही धार्मिक कार्य करण्यात येऊ नये.

२. पशुहत्या व अंधश्रध्दावाढीला प्रोत्साहन देणाऱ्या तिर्थक्षेत्रांना व वर्ग दर्जा दिला जाणार नाही तसेच निधी वितरीत केला जाणार नाही.

३. शासनमार्फत उपलब्ध करण्यात आलेल्या शासकीय निधीतून सुविधा देण्यात आलेली आहे, अशा प्रकारचे फलक दर्शनी भागास लावण्याचे बंधनकारक राहील.

(ए) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या http://www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक- २०१२१११६१६०६४८९९२० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( नं.म.शिंदे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३) मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
४) मा. मंत्री, ग्राम विकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
५) मा. राज्यमंत्री, ग्राम विकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व विभाग), मंत्रालय, मुंबई-३२
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर
८) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर
९) सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय.
१०) सर्व जिल्हाधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय.
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१३) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दिसाठी अग्रेषित
१४) सर्व कार्यासने, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-१
१५) निवड नस्ती, योजना-७, ग्रा.वि.व ज.सं.वि., मंत्रालय, मुंबई-१.

## परिशिष्ट - अ
## तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम - प्रस्ताव प्रपत्र

क्रमांक ..............................
जिल्हा परिषद.......................
दिनांक : ...........................

प्रति,
मा.प्रधान सचिव,
ग्रामविकास व जलसंधारण विभाग (योजना-७)
मंत्रालय,मुंबई-३२.

विषय : तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम सन २० -२०
ब वर्ग दर्जा देणे व निधी उपलब्ध होणेबाबत.
(योग्य ठिकाणी अशी खुण करावी.)

(१) (अ) यात्रास्थळ / तिर्थक्षेत्राचे नांव :

..........................................................................................................................

तालुका.................... जिल्हा........................................

(ब) ऐतिहासिक व पौराणिक महत्व :

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

(क) तिर्थक्षेत्रापासून नजीकचे गाव व
लोकसंख्या...........................................................................

(ख) ग्रामपंचायतीचे नांव .........................................................................

(ड) अंतर (कि.मी.मध्ये)
(१) राष्ट्रीय महामार्ग ..................... (२) राज्य मार्ग ....................
(३) जिल्हामार्ग............................ (४) इ.जि.मा.......................
(५) ग्रामीण रस्ता..........................

| | | | |
|---|---|---|---|
| इ) | तीर्थक्षेत्र नदी / तलावाचे काठावर आहे काय ? | नदी | तलाव |
| १ | असल्यास नदी बारमाही प्रवाहित असते काय ? | होय | नाही |
| | नसल्यास, प्रवाहित राहण्याचा कालावधी | | |
| २ | तीर्थक्षेत्र जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडून घोषित झाले आहे काय? | होय | नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्ग | अ | ब | क | (आदेशाची प्रत जोडावी) |

(३) (अ) यात्रा / जत्रा / ऊरुस कालावधी ( महिना व एकूण दिवस)..........................................

(ब) (१) यात्रा / जत्रा / ऊरुस या कालावधीत जमणारे भाविक / यात्रेकरुंची संख्या

..........................................................................................................................

(२) यात्रा / जत्रा कालावधी वगळता भेट देणा-या भाविकांची मासिक सरासरी संख्या

.............................................................................................................

(क) यात्रेचे स्वरुप .............................................................................

(१) भंडारा / महाप्रसाद इत्यादि कार्यक्रम होतो काय ? होय नाही

(२) कुस्त्यांची दंगल / उत्सव / छबीना / पालखी / रिंगण इत्यादीचे आयोजन होत असल्यास सविस्तर माहिती द्यावी

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

(४) तीर्थक्षेत्र / मंदिराचे व्यवस्थापन कोणाकडून करण्यांत येते?

| ग्रामपंचायत | देवस्थान न्यास (Trust) | संस्था | इतर |
|---|---|---|---|

(नोंदणीकृत संस्था / न्यास असल्यास नांव व नोंदणी क्रमांक नमूद करण्यांत यावा)

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

(५) उपलब्ध सुविधा

| (अ) | पिण्याचे पाणी | स्वतंत्र विहिर | देवस्थानाची स्वतंत्र पाणी पुरवठा योजना | प्रादेशिक/ ग्रा.पं. पा.पु. योजने कडून जोडणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| (ब) | स्वच्छता गृहे | मुतारी संख्या | | शौचालय | | स्नानगृह | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महिला | पुरुष | महिला | पुरुष | महिला | पुरुष |
| | युनिट संख्या | | | | | | |

(क) यात्रेकरु / भक्तनिवास (१) हॉल असल्यास एकूण क्षेत्रफळ ..........................................

(२) खोल्या असल्यास एकूण संख्या ..........................................

(३) प्रदक्षिणा मार्ग असल्यास लांबी एकूण मीटर ............

| | | |
|---|---|---|
| (ड) परिसर विद्युतीकरण झाले आहे काय | होय | नाही |
| (इ) नदी / तलावावर घाट आहे काय ? | होय | नाही |

(ई) वाहनतळ वाहनक्षमता (संख्या) ..........................................................................

(६) (अ) प्रस्तावित कामे व त्याची कामनिहाय अंदाजपत्रकीय किंमत (कामाचे कामनिहाय अंदाजपत्रकाची प्रत सोबत जोडावी)

(रुपये लाखात)

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत | आवश्यक निधी | प्रशासकीय मान्यतेचा दिनांक | तांत्रिक मान्यतेचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |
| ७ | | | | | |

टीप :(१) कामनिहाय प्रशासकीय / तांत्रिक मान्यता दिली आहे काय? (आदेशाच्या प्रती जोडाव्यात)

(२) इमारत बांधकाम असल्यास जागा उपलब्ध असल्याबाबत ७/१२ चा उतारा जोडावा. किंवा बांधकाम खाजगी जागेवर प्रस्तावित असल्यास संबंधित मालकाचे संमतीपत्रक स्टॅम्पपेपरवर रु.१००/- (रुपये शंभर फक्त) घेण्यांत आले आहे काय? व मूळ मालक निधी उपलब्ध झाल्यावर प्रत्यक्ष काम सुरु करण्यापूर्वी सदर जागा ग्रामपंचायतीला हस्तांतर करण्यास तयार आहे काय? (याबाबतचा खुलासा संमतीपत्रकात करण्यांत यावा)

(३) रस्त्यांचे काम असल्यास हा रस्ता तीर्थक्षेत्रापासून मुख्य रस्त्याला जोडणारा रस्ता आहे काय? तसेच नाली बांधकाम आवश्यक असल्यास ते अंदाजपत्रकात समाविष्ट आहे काय?

(४) प्रस्तावित तीर्थक्षेत्राची कामे पूर्ण झाल्यावर या कामाची देखभाल व दुरुस्ती कोण करणार आहे?

| ग्रामपंचायत | देवस्थान न्यास | संस्था | इतर |
|---|---|---|---|
| | | | |

टीप : हमीपत्राची प्रत सोबत जोडावी

(५) यापूर्वी तीर्थक्षेत्र विकास योजनेमधून अथवा स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार / खासदार निधी), वैधानिक विकास मंडळ विशेष निधी व इतर कार्यक्रम / योजनेतून निधी प्राप्त झाला आहे काय, असल्यास मागील पाच वर्षाची माहिती द्यावी. **(रुपये लाखात)**

| अ. क्र. | वर्ष | निधी स्त्रोत | कामाचे नांव | प्राप्त निधी | झालेला खर्च | अखर्चित रक्कम | कामाची सद्य:स्थिती (अपूर्ण असल्यास कारणांसह) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |

( )

**मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद.......**

टिप : (१) तीर्थक्षेत्र विकास योजनेचे प्रस्ताव उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांनी तपासून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करावेत.

(२) आवश्यकतेनुसार तिर्थक्षेत्रनिहाय स्वतंत्र प्रपत्रात माहिती देण्यांत यावी.

---